महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअँप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २८४ वा | दिनांक : १२/०९/२०२५ | वार : शुक्रवार

## मराठा समाजाला १० टक्के आरक्षण मिळत असताना हैदराबाद गॅझेटीयर कशासाठी? भुजबळांचा सवाल



**नाशिक** : मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर राज्यातील ओबीसी समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. तसेच मंत्री छगन भुजबळ यांनी उघडपणे सरकारने काढलेल्या शासन निर्णयाला विरोध केला आहे. छगन भुजबळ यांनी पत्रकार परिषद घेत आज पुन्हा एकदा सरकारच्या शासन निर्णयावर तसेच मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून टीका केली आहे.

छगन भुजबळ पत्रकार परिषद घेत म्हणाले, मराठा म्हणून सुद्धा आणि कुणबी म्हणून सुद्धा हा समाज ओबीसीमध्ये येऊ शकत नाही. तीन आयोगांनी देखील हा मुद्दा फेटाळून लावला आहे. काका कालेलकर आयोगाने देखील १९५५ सालीच सांगितले होते की मराठा समाजाला मागास प्रवर्गात घेता येणार नाही, त्यांना मागास म्हणता येणार नाही. मराठा समाजाचे मुख्यमंत्री झाले काही केंद्रात गेले, त्यांनी सुद्धा मराठा समाजाला मागास ठरवले नाही.

छगन भुजबळ म्हणाले की, मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आदर करतो. त्यांचा हेतू चांगला असेल, त्यांचा अभ्यास आहे. पण ज्या पद्धतीने ड्राफ्टिंग झाले आहे. त्या बाबतीत आम्ही अभ्यासकांशी बोललो आहोत. ते बोलले हे अडचणीचे झालेले आहे. पहिल्या जीआरमध्ये मराठा समाजाच्या पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र द्या, असा उल्लेख होता. जरांगे यांनी नंतर त्यांना सांगितले आणि पात्र हा शब्द काढला. यावरुन काय समजायचे? पुढे असे म्हटले की, नातेवाईक आणि नातेसबंध यात फरक आहे. नाते सबंध म्हणजे काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

पुढे बोलताना छगन भुजबळ म्हणाले, दुर्दैव असे की कास्ट सर्टिफिकेट जी आहेत ती मिळवली जातात आणि आपल्या देशात ज्या काही या प्रशासकीय संस्था आहेत, ती ज्या पद्धतीने काम करते हे त्यातला धागा आहे. खोटी प्रमाणपत्रे देण्याचे काम सुरू आहे आणि हा एक मोठा भ्रष्टाचार आहे. खोटी प्रमाणपत्रे जात बदलू शकत नाहीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. सामाजिक पद्धतीने मराठा समाज हा मागास नाही.

राजकीय दबावापोटी मराठा समाजाला मागास दाखवण्याचा प्रयत्न केला जाऊ नये, असे देखील नमूद करण्यात आले आहे, अशी माहिती छगन भुजबळ यांनी दिली आहे. शिंदे कमिटी जेव्हा आली तेव्हा या कमिटीने कुणबी नोंदी शोधून काढले आणि कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले. त्यानंतर मंत्रिमंडळात अहवाल सादर करण्यात आला आणि तो अहवाल स्वीकारण्यात आला. मग आता हैदराबाद गॅझेटचे काम काय? आता कशासाठी तर कुणबी नोंदी शोधायचे काम, ज्यांना मिळाले नाही त्यांच्यासाठी हे हैदराबाद आणले असा आमचा दावा आहे, असे भुजबळ म्हणाले.

जो काही शासन निर्णय काढण्यात आला आहे त्याआधी आलेल्या बातम्या पाहता एका समाजाच्या दबावाखाली, मंत्रिमंडळात अहवाल न ठेवता, हरकती व सूचना न मागवता शिवाय इतर मागासवर्गीयांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून काढण्यात आलेला हा शासन निर्णय असल्याचे छगन भुजबळ यांनी म्हटले आहे. सद्यःस्थितीत ओबीसीमध्ये ३५० जातींचा समावेश आहे आणि या शासन निर्णयामुळे त्यांच्या हक्कांवर गदा येईल, असेही भुजबळ म्हणाले.

छगन भुजबळ म्हणाले, या शासन निर्णयात मराठा समाजाचा शब्दप्रयोग केला आहे. प्रत्यक्षात कुणबी व मराठा दोन भिन्न जाती आहेत, हे महाराष्ट्र शासनाने मान्य केले आहे. कुणबी समाजाला ओबीसी आणि मराठा समाजाला सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गीय म्हणून शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण देण्यात आले आहे. म्हणजे सरकारने कबूल केले आहे की हे ओबीसीमध्ये नाहीत. मग त्यांच्यासाठी १० टक्के आरक्षण दिले आहे. त्यामुळे मराठा समाज या शब्दाचा वापर करून त्यांना पुन्हा ओबीसीमध्ये घेणे हे बेकायदेशीर आहे.

## कार्यक्रमात मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा करू नका, मनसेचा कॉमेडियन कपील शर्माला इशारा



**मुंबई** : मराठीच्या मुद्यावरून आक्रमक झालेल्या राज ठाकरे यांच्या मनसेने आता आपला मोर्चा टीव्ही कार्यक्रमांत मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा करणाऱ्यांकडे वळवला आहे. मनसेने या प्रकरणी कॉमेडियन कपील शर्मा याला आपल्या शोमध्ये मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा न करण्याचा इशारा दिला आहे. बॉम्बेचे मुंबई असे नामकरण होऊन तब्बल ३० वर्षे झालीत, अशी आठवण मनसेने यासंबंधी कपील शर्माला करून दिली आहे.

राज ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावर अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांनी शालेय शिक्षणात हिंदीच्या सक्तीला कडाडून विरोध केला. त्यानंतर राज्य सरकारला ही सक्ती मागे घ्यावी लागली. तत्पूर्वी, त्यांनी बँकांच्या व्यवहारातही मराठीचा आग्रह धरला. त्याचेही राज्यभरात तीव्र पडसाद उमटले. त्यानंतर आता मनसेने आपला मोर्चा विविध टीव्ही कार्यक्रमांत सातत्याने मुंबईचा उल्लेख बॉम्बे असा करणाऱ्यांकडे वळवला आहे. मनसेच्या चित्रपट आघाडीचे प्रमुख अमेय खोपकर यांनी एका ट्विटद्वारे यासंबंधी कॉमेडियन कपील शर्मा याला निर्वाणीचा इशारा दिला आहे.

अमेय खोपकर गुरूवारी आपल्या एका ट्विटमध्ये म्हणाले की, बॉम्बेचे मुंबई अधिकृत नामकरण होऊन ३० वर्षे झाली. त्यानंतरही बॉलिवूड मधील कपिल शर्मा शो मध्ये सेलिब्रिटी गेस्ट, दिल्लीस्थित राज्यसभा खासदार, शो अँकर आणि अनेक हिंदी चित्रपटात सर्रास बॉम्बे हा उल्लेख होत आहे. १९९५ महाराष्ट्र शासन व १९९६ मध्ये केंद्र शासनाची अधिकृत मान्यता मिळून चेन्नई, बंगळुरू, कोलकाताच्याही आधी मुंबई झाले आहे. तरी याचा मान राखून मुंबई उल्लेख करावा हा विनंती वजा इशारा देण्यात येत आहे.

अमेय खोपकर यांनी आपल्या पोस्टमध्ये एक व्हिडिओही जोडला आहे. त्यात अभिनेत्री हुमा कुरेशी मुंबईचा उल्लेख बॉम्बे म्हणून करताना दिसून येत आहे. खोपकर यांनी 'बॉम्बे टू मुंबई' असा हॅशटॅगही आपल्या ट्विटमध्ये वापरला आहे.

## भारत -पाक सामना खेळवणे एक प्रकारचा देशद्रोहच : संजय राऊत यांचा पंतप्रधान मोदींवर निशाणा



**मुंबई** : भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना हा देशाला मान्य नसल्याचे उद्धव ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे. त्यामुळे या सामन्याला विरोध म्हणून ठाकरे यांच्या शिवसेनेच्या महिला पदाधिकारी रविवारी सिंदूर आंदोलन करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. भारत - पाकिस्तान सामना खेळवणे हा एक प्रकारचा देशद्रोह असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. आता खून आणि क्रिकेट एकत्र कसे चालेल? असा सवाल देखील त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना विचारला आहे.

उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या भेटी बद्दल वृत्तपत्रात आलेल्या सर्व बातम्या या खोट्या आहेत. दोन बंधू एकत्र आले याला तुम्ही राजकारणाच्या दृष्टिकोनातून कसे पाहता? ही राजकीय भेट कशी म्हणता येईल? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काल दोन भाऊ एकमेकांना भेटले. मी देखील त्यांना मित्र म्हणून भेटलो. मग त्याला राजकीय भेट कसे म्हणता? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्यानंतर होणारी पदाधिकारी बैठक म्हणजे नियमित चालणारी प्रक्रिया असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आल्या आहेत. त्यामुळे पदाधिकाऱ्यांच्या बैठका या होतच असतात, असे देखील राऊत यांनी म्हटले आहे.

अबुधाबी येथे १४ सप्टेंबर रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना खेळवला जाणार आहे. भारतीय क्रिकेट बोर्डाने यात सहभाग घेतला आहे. मात्र, लोकभावना या विरोधात आहे. अजूनही जे २६ निरपराध लोक पहलगाम येथे मारले गेले. त्यांच्या कुटुंबियांचा आक्रोश अद्याप संपलेला नाही. यातील अतिरेकी सापडलेले नाहीत. ऑपरेशन सिंदूर आजही सुरू असल्याचे सांगितले जातय. काश्मीरमध्ये पाकिस्तानच्या कारवाया थांबलेल्या नाहीत. अशा वेळेला पाकिस्तानच्या कंबरडे मोडायचे आणि पाकिस्तान सोबतचे सर्व संबंध तोडून टाकण्याची भाषा देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग आणि भारतीय जनता पक्षाचे सर्व असली किंवा नकली हिंदुत्ववादी नेते करत आहेत.

खून आणि पाणी एकसाथ वाहणार नाही, असे म्हणत पाकिस्तानला जाणारे सिंधू नदीचे पाणी बंद केले. मग खून आणि क्रिकेट एक साथ कसे चालेल? असा आमचा प्रश्न असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे. आमच्या महिलांचे उजाडलेले सिंदूर एवढ्या लवकर विसरलात का? हा काय प्रकार आहे. भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि विश्व हिंदू परिषद या सर्वांना आमचा सवाल आहे की, त्यांची भारत-पाक क्रिकेट सामना विषयी काय भूमिका आहे? हे त्यांनी स्पष्ट करायला हवे, अशी मागणी संजय राऊत यांनी केली आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५


## इकरा पब्लिक शाळेतील २ खेळाडूंची जिल्हास्तरीय जलतरण स्पर्धेत चमकदार कामगिरी





**जळगाव :** जिल्हा क्रीडा परिषद,जळगाव, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय,जळगाव आयोजीत जळगाव जिल्हा उर्वरीत जलतरण स्पर्धांचे आयोजन नुकतेच पार पडले या स्पर्धा छत्रपती श्री शिवाजी महाराज जिल्हा क्रीडा संकुल जलतरण तलाव,येथे आयोजित करण्यात आलेलं होते जिल्हास्तरीय १४ वर्षांखालील जलतरण स्पर्धेत येथील इकरा पब्लिक शाळेतील विद्यार्थी यहिया हिदायतूल्ला खाटीक (आठवी) व झकेरिया खाटीक (सहावी) यांनी यश संपादन केले.या जलतरण स्पर्धेत यहियाने ५० मीटर फ्री स्टाईलमध्ये द्वितीय, १०० मीटर फ्री स्टाईलमध्ये द्वितीय व २०० मीटर ब्रेस्ट स्ट्रोकमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला तसेच झकेरिया खाटीकने ५० मीटर बटरफ्लाय मध्ये तृतीय व १०० मीटर बटरफ्लायमध्ये द्वितीय क्रमांक प्राप्त केला व दोघांचे शालेय विभागीय स्तरावर होणाऱ्या जलतरण स्पर्धासाठी निवड करण्यात आली शाळेचे नाव उज्जवल करणाऱ्या या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अब्दुल करीम सालार,उपाध्यक्ष डॉ.इकबाल शाह जनरल सेक्रेटरी एजाज मलिक व मुख्याध्यापक शेख शकील यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेचे क्रीडाशिक्षक आमीर खान यांचे मार्गदर्शन लाभले.

## विकसित भारतासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे




**जालना :** वर्तमान परिस्थितीत आपल्या देशात युवकांची संख्या जास्त असून देश विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांची भूमिका महत्त्वाची आहे असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. सोमीनाथ खाडे यांनी केले. बद्रीनारायण बारवाले महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजनेच्या प्रबोधन शिबिरात ते बोलत होते. यावेळी प्राचार्य डॉ. कविता प्राशर यांची उपस्थिती होती.डॉ. सोमीनाथ खाडे पुढे म्हणाले की, राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमाद्वारे विद्यार्थ्यांत राष्ट्रप्रेम, सामाजिक बांधिलकी, संवेदनशीलता यासारखी मूल्य रूजविण्यात येतात. पदवीचे शिक्षण घेताना सामाजिक भान आपल्यात आले पाहिजे. समाजाचे ऋण फेडण्यासाठी विद्यार्थ्यांनी सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे. याकरिता विद्यार्थ्यांनी मनापासून शिकले पाहिजे. आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी शिस्तबद्ध व प्रामाणिकपणे केलेला अभ्यास तुम्हाला उज्वल आयुष्याकडे घेऊन जाईल. सध्याच्या स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी कष्ट प्रामाणिकपणा, जिद्द या गुणांचा अवलंब केला पाहिजे. राष्ट्रीय सेवा योजनेचा विद्यार्थी हा देशाचा आधारस्तंभ असतो आणि तोच देशाला विकसितपणाकडे घेऊन जातो. असेही ते म्हणाले.प्राचार्य कविता प्राशर यांनी अध्यक्षीय समारोप केला. प्रारंभी प्रास्ताविकात राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. उद्धव थोरवे यांनी उद्बोधन शिबिराची भूमिका स्पष्ट केली. या शिबिरातून विद्यार्थ्यांवर नैतिक मूल्याचे संस्कार केल्या जात आहे. सद्यस्थितीत उत्तम संस्कार दुर्मिळ झाले असून समाजात असमतोलपणा निर्माण होत आहे असे ते म्हणाले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. क्षमा अनभुले यांनी केले तर आभार प्रा. अभिजीत भुतेकर यांनी मानले. यावेळी डॉ. व्यंकट कोरेबोईनवाड, प्रा.कांचन कायंदे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## आपत्ती व्यवस्थापन विषयक जनजागृती कार्यक्रम मनपा आणि स्मार्ट सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने संपन्न



**छत्रपती संभाजीनगर :** आज दि. ११-०९-२०२५ रोजी म.न.पा. केंद्रीय प्राथमिक व माध्यमिक विद्यालय, मुकुंदवाडी येथे आपत्ती व्यवस्थापन विषयक जनजागृती कार्यक्रम मनपा आणि स्मार्ट सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना व शिक्षकांना आपत्तीच्या काळात स्वतःचे व इतरांचे संरक्षण कसे करावे, भूकंप किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीच्या वेळी कोणती खबरदारी घ्यावी याबाबत सखोल माहिती श्री अनिल जाधव, श्रीमती प्रेरणा देशमुख आणि श्रीमती अश्विनी भुजाडे यांनी आपले अनुभव आणि उपयोगी उपाय यांचा समावेश असलेले उत्कृष्ट मार्गदर्शन केले. याप्रसंगी मुख्याध्यापक श्री के.बी. चौधरी व शिक्षक उपस्थित होते.

## प्रा. राहुल म्हस्के यांना "संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान" विषयात पीएचडी प्रदान



**जालना :** सिद्धार्थ कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाफराबाद जि. जालना, येथील संगणक शास्त्र विभागातील प्राध्यापक व विभाग प्रमुख प्रा. राहुल जनार्दन म्हस्के यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने " संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान" (Computer Science and Information Technology) या विषयात पीएच.डी. ही सर्वोच्च पदवी प्रदान केली आहे.प्रा. राहुल म्हस्के यांनी डॉ. प्राप्ती डी. देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सायन्स अँड टेक्नॉलॉजी शाखेंतर्गत " ऑटोमॅटिक फ्रुट कॉलिटी आयडेंटिफिकेशन सिस्टीम फॉर इमिनन्स इन्स्पेक्शन थ्रू कलर इमेज प्रोसेसिंग" हा संशोधन प्रबंध विद्यापीठात सादर केला होता, विद्यापीठाने त्यांच्या या पीएच.डी. प्रबंधास मान्यता देऊन त्यांना 'संगणक शास्त्र व माहिती तंत्रज्ञान ' या विषयात पीएचडी पदवीची मान्यता दिली.प्राध्यापक राहुल म्हस्के हे सिल्लोड शिक्षण संस्थेचे सचिव आहेत तसेच ते नालंदा मॅनेजमेंट अँड कम्प्युटर सायन्स महाविद्यालय ( बीसीए/ बीसीएस महाविद्यालय ) छत्रपती संभाजीनगर येथे प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या विविध समित्यावर तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ सिनेट सदस्य, स्थायी समिती व व्यवस्थापन परिषद सदस्य म्हणून देखील विद्यापीठ प्राधिकरणावर त्यांनी कार्य केले आहे.त्यांचे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शोधनिबंध प्रकाशित झालेले आहेत. U.A.E.( संयुक्त अरब अमिराती) येथील दुबई येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. रावसाहेब कसबे डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तसेच थायलंड येथील बँकॉक मध्ये भरलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहित्य परिषद या आंतरराष्ट्रीय परिषदेत देखील त्यांना साहित्य क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे . नेपाळ येथील त्रिभुवनदास विद्यापीठातर्फे घेण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत देखील त्यांनी आपला शोध निबंध ( Research paper) सादर केला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात सादर केलेल्या संशोधनास विद्यापीठाने पीएचडी साठी प्रदान केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा. जनार्दनराव म्हस्के, उपाध्यक्ष भारत म्हस्के, श्री मधुकर शिनगारे, डॉ. बी.के. मगरे, डॉ.अमित पुंड, सिद्धार्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.टि. देशमुख ,उप प्राचार्य डॉ.एस. एल.मेढे, डॉ. एस. के.सजे. प्रा. विनोद हिवराळे,डॉ. आर.टि. उबाळे, प्रा. वाल्मीक वाघ, प्रा. हर्षपाल खाडे तसेच सिल्लोड शिक्षण संस्थेअंतर्गत शाळा-महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, नातेवाईक व मित्र आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


**बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002**

**महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.**
**कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.**
**संपर्क क्र. 7588005002**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५


## वर्षातून एकच महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करावी : पैलवान चंद्रहार पाटलांची मागणी



**सांगली :** महाराष्ट्र केसरी किताबाची किंमत कमी होत असल्याबद्दल दुहेरी महाराष्ट्र केसरी पैलवान चंद्रहार पाटील यांनी चिंता व्यक्त केली आहे. कुस्तीगीर संघटनांमधील मतभेद, श्रेयाची लढाई आणि राजकीय हस्तक्षेपामुळे वर्षाला तीन ते चार महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित केल्या जातात, ज्यामुळे या प्रतिष्ठित किताबाची प्रतिष्ठा घटत आहे, असे पाटील यांचे म्हणणे आहे. यावर तोडगा काढण्यासाठी वर्षातून केवळ एकच महाराष्ट्र केसरी स्पर्धा आयोजित करावी, या मागणीसाठी ते लवकरच आझाद मैदानावर उपोषणाला बसणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

पै. चंद्रहार पाटील म्हणाले, राज्यात 1960 पासून महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धा ही राज्यातील सर्वोच्च मानाची एकमेव स्पर्धा घेतली जात होती. मात्र अलीकडे संघटनांमधील मतभेद, श्रेयवाद आणि राजकीय हस्तक्षेपामुळे वर्षभरा त तीन ते चार महाराष्ट्र केसरी स्पर्धा होत असून त्यामुळे कुस्तीगिरांची मोठ्या प्रमाणावर हेळसांड होते. शिवाय केसरी किताबाची किंमत घटत आहे.

पुढे बोलताना चंद्रहार पाटील म्हणाले, तसेच अनेक स्पर्धा झाल्यामुळे खरा महाराष्ट्र केसरी कोण हेच लोकांना समजेनासे झाले आहे. गतवर्षी निवडणुका असल्याने 2024 मधील स्पर्धा पुढे ढकलली. परिणामी 2025 मध्ये दोन स्पर्धा झाल्या आणि नोव्हेंबरमध्ये पुन्हा दोन स्पर्धा होणार आहेत. आता आणखी एक संघटना उदयास आल्याची माहिती आहे. अशा परिस्थितीत एका वर्षात चार ते पाच महाराष्ट्र केसरी निर्माण होणार आहेत.

वास्तविक प्रत्येक महाराष्ट्र केसरीला शासनाकडून पेन्शन आणि अन्य सुविधा दिल्या जातात. मग एका वर्षाला अनेक महाराष्ट्र केसरी असतील तर शासन कोणाला खरा महाराष्ट्र केसरी मानणार? ही जबाबदारी शासनाची आहे. लवकर निर्णय न घेतल्यास आम्ही मुंबईच्या आझाद मैदानावर उपोषणाला बसणार आहोत, असा इशारा चंद्रहार पाटलांनी दिला आहे.

या मागणीसाठी यापूर्वी सांगली जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर उपोषण केले होते. तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मंत्री दत्तात्रय भरणे यांना भेटून एकच महाराष्ट्र केसरी स्पर्धा व्हावी अशी मागणी केली होती. मात्र ती अद्याप मान्य न झाल्याने व तोडगा न निघाल्यामुळे उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. आमचा कोणत्याही कुस्तीगीर संघटनेला विरोध नाही, मात्र दरवर्षी एकच महाराष्ट्र केसरी स्पर्धा झाली पाहिजे, हीच आमची मागणी आहे, असेही पाटील यांनी सांगितले आहे.

## युवकांनी स्वामी विवेकानंदांचा आदर्श घेऊन कार्य करावे




**जालना (प्रा. डॉ. राजेंद्र सोनवणे) :** संपूर्ण ज्ञानाचा सागर म्हणजे स्वामी विवेकानंद होते युवकांनी त्यांचा आदर्श घेऊन कार्य करावे असे प्रतिपादन जेइएस महाविद्यालय जालना येथील स्वामी विवेकानंद केंद्राच्या युवा नेतृत्व गुण शिबिरात बोलताना केले.जे ई एस महाविद्यालय जालना येथे स्वामी विवेकानंद केंद्रा तर्फे एक दिवशीय युवा नेतृत्व गुण विकास शिबिराचे आयोजन करण्यात आले होते यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते होते कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक छत्रपती संभाजी नगर देवगिरी प्रांताचे प्रमुख श्री. चंद्रशेखर दीक्षित हे होते यावेळी व्यासपीठावर विवेकानंद केंद्राचे संचालक डॉ. नागनाथ शेवाळे, संजय जाधव, शुभम मंडोरे ,श्री दायमा यांची प्रमुख उपस्थिती होती.या शिबिराचे प्रास्ताविक प्रा. डॉ.नागनाथ शेवाळे यांनी केले, युवकांनी स्वामी विवेकानंदांचे साहित्य वाचावे व त्याचे अनुकरणही करावे यामुळे युवकांच्या जीवनात परिवर्तन होईल असेही प्रास्ताविकात डॉ. शेवाळे यांनी सांगितले.यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना श्री चंद्रशेखर दीक्षित म्हणाले की युवकांनी विवेकानंदांचा आदर्श घेऊन कार्य करावे, विवेकानंद हे ज्ञानाचे सागर होते जीवनातील प्रत्येक क्षेत्रात त्यांचे कार्य आहे. अध्यात्मिक, शैक्षणिक राजकीय ,सामाजिक वेगवेगळ्या विषयांवर त्यांनी समर्पक असे मार्गदर्शन आपल्या साहित्यातून युवकांना केलेले आहे. विवेकानंदांचे कार्य जगभर पसरलेले असून ते महान आहे. स्वामी विवेकानंद हे सामान्य युवकांसाठी प्रेरणा स्तोत्र असून, अनेक युवकांनी त्यांची प्रेरणा घेऊन जीवनात वाटचाल केलेली आहे असेही श्री. दीक्षित यांनी सांगितले.यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे, मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक डॉ.यशवंत सोनूने, राज्यशास्त्र विभाग प्रमुख डॉ वसंत पवार, डॉ. बाबू तोटरे, डॉ. प्रवीण पवार, प्रा.सतीश लोंढे, डॉ. किशोर बिरकायलु प्रा.लहाने, प्रा. भाग्यश्री बियाणी, आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री शुभम मांढरे यांनी तर उपस्थितांचे आभार डॉ बाबुराव श्रीरामे यांनी मानलेत यावेळी महाविद्यालयातील युवक युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते.






## कोल्हापूरची वाघीण २६ सप्टेंबरपासून सैन्य दलात

**कोल्हापूर :** सैन्यात असलेल्या पतीचे तीन वर्षांपूर्वी निधन झाल्यानंतर अत्यंत धैर्याने खडतर प्रशिक्षण पूर्ण करत कोल्हापूर जिल्ह्यातील तारदाळ येथील प्रियंका नीलेश खोत यांची सैन्य दलात नियुक्ती झाली आहे. चेन्नईमध्ये झालेल्या ऑफिसर ट्रेनिंग अकादमीमध्ये पासिंग आऊट परेडमध्ये प्रियंका यांची लेफ्टनंटपदी नियुक्ती करण्यात आली.

प्रियंका यांनी अत्यंत समर्थपणे केलेली ही कामगिरी उल्लेखनीय ठरलेली आहे. वीरपत्नीच्या कोट्यातून भारतातून अवघी एक जागा असलेल्या पदावर प्रियंका खोत यांची निवड झाली आहे. दरम्यान, अडीच वर्षांच्या मुलीला कुटुंबाकडे सोपवून त्यांनी नोएडात 4 महिने विशेष प्रशिक्षण घेतले. सैन्य दलात सहभागी होण्यासाठी आवश्यक असणारी प्रवेश परीक्षा त्या यशस्वीपणे उत्तीर्ण झाल्या. त्यानंतर त्या 11 महिन्यांच्या प्रशिक्षण शिबिरात सहभागी झाल्या आणि आता त्या उत्तीर्ण झाल्यानंतर सैन्य दलात सहभागी होण्याचा त्यांचा मार्ग मोकळा झाला आहे. 26 सप्टेंबरपासून त्या सैन्य दलात प्रत्यक्ष सेवा बजावणार आहेत. प्रियांका यांची निवड झाल्याने कोल्हापूरसह राज्यासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे.

कोल्हापूर येथील जवान नीलेश खोत यांचे 7 नोव्हेंबर 2022 रोजी सैन्य दलात असताना हृदयविकाराच्या धक्क्याने निधन झाले. नीलेश यांच्या निधनापूर्वी त्यांच्या वडिलांचेही निधन झाले. हा दुहेरी धक्का खोत कुटुंबाला सोसावा लागत होता. या प्रसंगाने प्रियंका खचल्या होत्या. निराशेच्या गर्तेत गेलेल्या प्रियंकांना कुटुंबीयांनी सावरण्यास मदत केली.

नीलेश हे सैन्य दलात असल्याने सैन्य दलाविषयी प्रियंका यांना बरीच माहिती होती. त्यांनी सुरुवातीला बँकिंग स्पर्धा परीक्षा देण्याची तयारी केली होती. परंतु, सैन्य दलातील काही अधिकाऱ्यांनी सैन्य दलात सहभागी होण्याची संधी कशी आहे याविषयी मार्गदर्शन केले. त्यासाठी तुमच्याकडे आवश्यक ती शैक्षणिक पात्रता असल्याचेही जाणवून दिले.

प्रियंका यांच्या कामगिरीनंतर तारदाळ गावच्या ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढत त्यांचा सन्मान केला. गावकऱ्यांनी केलेल्या सन्मानानंतर प्रियंका भारावून गेल्या. आपल्या यशात कुटुंबाने दिलेल्या पाठिंब्याचा मोठा वाटा असल्याचे सांगितले. जंगी सत्कारानंतर प्रियंका यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी बोलताना प्रियंकांनी गेल्या 11 महिन्यांतील खडतर प्रशिक्षणाची माहिती दिली. विपरीत परिस्थिती असतानाही यशस्वी ठरल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५


# मुरूम भागात ढगफुटी; शेती पिकाचे मोठे नुकसान





**मुरुम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : मुरूम तसेच परिसरातील आलूर,केसरजवळगा,मुरळी, कोथळी,आचार्य तांडा ,तुगाव याभागात बुधवारी रात्रभर तसेच गुरुवारी व शुक्रवार(११ व १२ सप्टेंबर)रोजी पहाटे 3 ते सकाळी ७वाजे पर्यंत ढगफुटीमुळे हाहाकार माजला होता मोठयाप्रमाणात आलेल्या पावसाने शेतातील सोयाबीन,उडीद,ऊस,तूर यासारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. दरम्यान प्रशासनाने तातडीने नुकसानीची पाहणी करावेत अशी मागणी मुरूम तसेच मुरूम ग्रामीण भागातील शेतकऱ्यासह विविध राजकीय पक्ष आणि संघटनेच्यावतीने करण्यात येत असून याबाबत दैनिकाशी अनेकांनी प्रतिक्रिया दिल्या आहेत"बुधवारी तसेच गुरुवारी ढगफुटीमुळे जनजीवन विस्कळीत झाली,आलेल्या जोरदार पावससाने शेतीपिकाचे नुकसान मोठया प्रमाणात झाले आहे त्यामुळे प्रशासनाने तातडीने नुकसानीची पाहणी करून शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी अहवाल शासनाकडे द्यावा अशी मागणी उमरगा तहसीलदार तसेच कृषी विभाग उमरगा यांच्याकडे निवेदन देऊन करण्यात आली आहे"गणेश अंबरअध्यक्ष मुरूम मंडळ,भारतीय जनता पार्टी"अतिवृष्टीमुळे खरीप पिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे,उडीद,सोयाबीन पीक हातातून पूर्णपणे गेले आहे त्यामुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना शासनाने तातडीने मदत करून दिलासा द्यावा"सुरेश शेळके,अध्यक्ष-भाजपा कृषी विभाग "अतिवृष्टीमुळे शेती पिकाचे नुकसान झाले आहे सोबतच शहरी व ग्रामीण भागातील अनेक लोकांचे राहते दगडाच्या घरांच्या भिंतीचे पडझड झाल्याने अनेक कुटुंब उघड्यावर आले आहेत त्यामुळे शासनाने तात्काळ मदत द्यावी"रामकृष्ण अंबरमुरूम शेतकरी"शेतीपिकाचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांना आता आर्थिक समस्याला तोंड द्यावा लागणार आहे,पेरणीसाठी झालेला आर्थिक खर्च व त्यासाठी इतरांकडून घेतलेली रक्कम फेडावे कसे याची चिंता आहे म्हणून शासनाने तात्काळ मदत द्यावी"लिंबणा खुणे,शेतकरी मुरूम


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# चंद्रग्रहणाविषयी अंधश्रद्धा पसरवणाऱ्यांवर कारवाई करावी

**सातारा** : अलीकडेच झालेल्या चंद्रग्रहणाच्या निमित्ताने गर्भवती महिलांबाबत सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक माहिती पसरवली गेली. यावर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) ने तीव्र आक्षेप घेत, अशा व्यक्ती आणि संस्थांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. अंनिसने प्रसिद्धीपत्रक काढून या बाबींकडे शासनाचे लक्ष वेधले आहे.

रविवार, 7 सप्टेंबर रोजी रात्री लागलेल्या चंद्रग्रहणानिमित्त सोशल मीडियावर अंधश्रद्धांचा अक्षरशः पाऊस पडला. गर्भवती महिलांनी ग्रहणकाळात एका जागी बसावे, पाणी पिऊ नये, मलमूत्र विसर्जन टाळावे, अशा प्रकारचे अवैज्ञानिक आणि आरोग्यास धोकादायक सल्ले मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाले. इतकेच नव्हे, तर ग्रहणाचा गर्भावर दुष्परिणाम होतो, असेही चुकीचे दावे पसरवण्यात आले. याच प्रकारच्या चुकीच्या सल्ल्यामुळे तीन वर्षांपूर्वी साताऱ्यात एका गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

राज्यातील अनेक स्त्रीरोग तज्ज्ञ संघटनांनी स्पष्टपणे सांगितले आहे की, ग्रहणाचा गर्भवती महिलांवर किंवा गर्भावर कोणताही परिणाम होत नाही. तरीही काही वृत्तवाहिन्या आणि सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर या अंधश्रद्धा सातत्याने पसरवल्या जात असल्याचे दिसून आले. एका बाजूला चंद्रावर यान पाठवण्याची तयारी करणारा देश वैज्ञानिक प्रगती करत असताना दुसऱ्या बाजूला ग्रहणासंबंधी अंधश्रद्धांना बळी पडतो, ही दुर्दैवी बाब असल्याचे महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीने (अंनिस) प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे.

अंनिसने पत्रकात नमूद केले की, चंद्रग्रहण ही एक साधी खगोलीय घटना आहे. यात कोणत्याही प्रकारची नवीन ऊर्जा किंवा किरणे निर्माण होत नाहीत. पृथ्वी, चंद्र आणि सूर्य एका सरळ रेषेत आल्यानंतर निर्माण होणारा सावल्यांचा हा केवळ परिणाम असतो. त्यामुळे ग्रहणकाळात अन्न खाणे, पाणी पिणे, बाहेर फिरणे, दैनंदिन व्यवहार करणे किंवा भाजी चिरणे, कात्री वापरणे यासारख्या साध्या गोष्टींवर कुठलाही परिणाम होत नाही. गर्भवती महिलांनी पाय क्रॉस करून बसणे, झोपणे किंवा चाकू-कात्री वापरणे या गोष्टींमुळे गर्भावर दुष्परिणाम होतो, ही धारणा पूर्णपणे चुकीची असल्याचे अंनिसने स्पष्ट केले आहे.

वैद्यकीय बाबतीत चुकीची माहिती पसरवणे ही गंभीर बाब असून, याविरोधात शासनाने कठोर कारवाई करावी, अशी मागणी अंनिसने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी कोरोनाविषयक आणि अलोपॅथीविरोधी दिशाभूल करणाऱ्या दाव्यांप्रकरणी सरकारला अशा चुकीच्या माहिती विरुद्ध कारवाई करण्याचे आदेश दिले होते. ग्रहणाविषयी पसरवल्या जाणाऱ्या अफवा आणि गर्भवती महिलांशी संबंधित अंधश्रद्धा या त्याच प्रकारात मोडतात, त्यामुळे सरकारने तातडीने कारवाई करावी, असे पत्रकात म्हटले आहे.

या मागणीसाठी अंनिसचे राहुल थोरात, डॉ. हमीद दाभोलकर, मिलिंद देशमुख, नंदिनी जाधव, रामभाऊ डोंगरे, सम्राट हटकर, अण्णा कडलास्कर, डॉ. अशोक कदम, मुंजाजी कांबळे, प्रकाश घादगिने, मुक्ता दाभोलकर, फारुख गवंडी आणि प्रवीण देशमुख यांनी स्वाक्षरी केली आहे.

सोशल मीडियावर डॉक्टरी डिग्री नसतानाही गर्भवती महिलांना आरोग्याविषयी सल्ला देणाऱ्यांवर "बोगस डॉक्टर" म्हणून कारवाई करावी, अशीही अंनिसची मागणी आहे.

# अवघ्या १० वर्षीय मुलाचा हार्ट अटॅकने मृत्यू



**कोल्हापूर** : कोल्हापूरच्या कोडोली गावात अवघ्या १० वर्षीय मुलाचा हार्ट अटॅकने मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. हा मुलगा बुधवारी रात्री गणपतीपुढे खेळून घरी आईच्या कुशीत विसावला व काही क्षणांतच त्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाला. या घटनेमुळे पंचक्रोशीत हळहळ व्यक्त केली जात आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, श्रावण अजित गावडे असे मृत मुलाचे नाव आहे. त्याचे कुटुंब कोडोली गावच्या आनंदनगर वसाहतीमधील शिवनेरी गल्लीत राहत होते. श्रावण बुधवारी सायंकाळी गणेश मंडळाच्या मंडपात मित्रांसोबत खेळत होता. तो नेहमीसारखाच खेळत बागडत होता. पण अचानक त्याला अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे तो खेळ सोडून घराच्या दिशेने निघाला. घरी पोहोचल्यानंतर थेट आईच्या मांडीवर जाऊन विसावला. आईच्या कुशीत मांडी ठेवून तो तिला काहीतरी सांगण्याचा प्रयत्न करत होता. पण तेव्हाच त्याला हृदयविकाराचा तीव्र धक्का आला आणि त्याची प्राणज्योत मालवली. त्याने आईच्या मांडीवरच आपले डोळे मिटले.

हे पाहून त्याच्या आईने एकच हंबरडा फोडला. तो ऐकूण शेजारचे लोक मदतीसाठी धावले. त्यांनी श्रावणला तत्काळ लगतच्या रुग्णालयात दाखल केले. पण डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. डॉक्टरांनी श्रावणचा मृत्यू हृदयविकाराच्या झटक्यामुळे झाल्याचे स्पष्ट केले. श्रावण इयत्ता चौथीत शिकत होता. तो त्याच्या आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. या दाम्पत्याने ४ वर्षांपूर्वीच आपल्या एका लहान मुलीला गमावले होते. त्यानंतर आता श्रावणही काळाच्या पडद्याआड केल्यामुळे त्यांच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

हृदयरोग तज्ज्ञ डॉक्टर अक्षय बाफना याविषयी 'एबीपी माझा'शी बोलताना म्हणाले की, या वयाच्या रुगांमध्ये आरोग्याच्या काही जेनेटिक समस्या असतात किंवा हृदयाला रक्त पुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्यांत अडथळे निर्माण होऊ अशी घटना घडू शकते. अचानक काही त्रास झाल्यास, ताणतणाव असेल किंवा एकाएकी धावपळ केल्यानंतर हृदयाला होणारा रक्तपुरवठा कमी होऊन असा अटॅक येऊ शकतो.

आपण स्क्रीनिंग करतो किंवा एखाद्या रुग्णाला धाप वगैरे लागली तर त्यानंतर चाचण्या केल्या जातात. पण सर्वसाधारणपणे या चाचणी नियमितपणे केल्या जात नाहीत. त्यामुळे असे अचानक धोके निर्माण होतात. मॅरेथॉनमध्ये धावणाऱ्या धावपटूंचा अचानक हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू होत असल्याची बाब आपण यापूर्वी अनेकदा पाहिली आहे, असेही ते यावेळी म्हणाले.

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार १२ सप्टेंबर २०२५

# प्रोत्साहनाचा सामाजिक महामंत्र : राष्ट्रीय प्रोत्साहन दिनाचे समाजशास्त्रीय भान

मानवी समाजाचा पाया हा आशा, परस्परावलंबन आणि सकारात्मक भावनांवर उभा असतो. या भावनांमधील सर्वात प्रभावी भावना म्हणजे प्रोत्साहन होय. प्रोत्साहन ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून ती सामाजिक ऊर्जेचा असा प्रवाह आहे जो व्यक्तीला आत्मविश्वास देतो, समूह किंवा गटांना ऐक्य देतो आणि समाजाला प्रगतीची दिशा देतो. म्हणूनच दरवर्षी दि. १२ सप्टेंबर रोजी साजरा होणारा 'राष्ट्रीय प्रोत्साहन दिन' आपल्याला या अदृश्य परंतु अत्यंत प्रभावी शक्तीचे स्मरण करून देतो. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले, तर प्रोत्साहन हा मानवी विकासाचा अविभाज्य घटक आहे.

**कुटुंब आणि प्रोत्साहन :-**

समाजशास्त्र सांगते की कुटुंब ही समाजाची प्राथमिक सामाजिक संस्था आहे. माणूस पहिल्यांदा जी मूल्ये शिकतो, ती याच कुटुंब या सामाजिक संस्थेतून शिकतो. प्रोत्साहन हे मूल्य कुटुंबातील रोजच्या संवादातून मुलांमध्ये बिंबते. आईवडिलांचे 'तू हे करू शकशील' हे एक वाक्य मुलामध्ये आत्मविश्वास निर्माण करते. भावंडांची साथ, आजी-आजोबांचे आशिर्वाद, ही सगळी प्रोत्साहनाची रूपे आहेत. समाजशास्त्रज्ञ एमिल दुर्खीमने म्हटल्याप्रमाणे, व्यक्तीचे सामाजिकरण हे समाजाचे पुनरुत्पादन आहे. जर कुटुंबात सकारात्मकतेचे आणि प्रोत्साहनाचे वातावरण असेल, तर मुलामध्ये आशावादी दृष्टिकोन विकसित होतो. याउलट सततची टीका, तुलना आणि नकारात्मकता यामुळे मुलामध्ये आत्मविश्वासाची कमतरता निर्माण होते, आणि त्याचा परिणाम पुढील सामाजिक जीवनावर होतो.

**शिक्षणव्यवस्था आणि प्रोत्साहन :-**

शिक्षण हे समाजातील सामाजिक गतिशीलतेचे मुख्य साधन आहे. परंतु शिक्षण फक्त माहितीपुरते मर्यादित नसून ते मुलांच्या मानसिक आणि भावनिक विकासालाही दिशा देते. शिक्षकाच्या प्रोत्साहनाने विद्यार्थ्यांची शिकण्याची आवड टिकून राहते. अनेक संशोधनांमध्ये दिसून आले आहे की ज्या विद्यार्थ्यांना शिक्षकांकडून सकारात्मक दाद मिळते, त्यांची शैक्षणिक प्रगती अधिक वेगवान होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शालेय जीवनात शिक्षकांनी दिलेले प्रोत्साहनच त्यांना उच्च शिक्षणाच्या मार्गावर नेणारे ठरले. समाजशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर प्रोत्साहन ही सामाजिक भांडवलाची गुंतवणूक आहे. कारण प्रत्येक प्रोत्साहित विद्यार्थी समाजासाठी उपयोगी संसाधन ठरतो.

**कार्यक्षेत्र आणि प्रोत्साहन :-**

समाजशास्त्रात 'मानवी संसाधन' ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. कामाच्या ठिकाणी व्यक्ती फक्त पगारासाठी काम करत नाही, तर त्याला स्वतःची किंमत मान्य व्हावी, ही अपेक्षा असते. वरिष्ठांचे प्रोत्साहन, सहकाऱ्यांचा आधार आणि संस्थेची मान्यता हे घटक कर्मचारी समाधानीपणा आणि उत्पादनक्षमतेला चालना देतात. कामगारांच्या उत्पादनक्षमतेत वाढ ही फक्त तांत्रिक सुधारांमुळे होत नाही, तर त्यांना मिळणाऱ्या सामाजिक मान्यतेमुळे आणि प्रोत्साहनामुळेही होते. त्यामुळे प्रोत्साहन हे केवळ व्यक्तीच्या कारकिर्दीला नव्हे, तर संस्थेच्या विकासालाही दिशा देते.

**वंचित समाजगट आणि प्रोत्साहन :-**

इतिहास साक्ष देतो की समाजातील दुर्बल गटांना जेव्हा प्रोत्साहन मिळाले, तेव्हा त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांना दिलेले शिक्षणाचे प्रोत्साहन, राजर्षी शाहू महाराजांनी मागासवर्गीयांना दिलेला सामाजिक आधार, आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वंचितांना शिक्षण घेण्याचे आवाहन या सर्व उदाहरणांनी प्रोत्साहनाची परिवर्तनकारी ताकद अधोरेखित केली आहे. समाजशास्त्रीय भाषेत सांगायचे झाले तर प्रोत्साहन हे सामाजिक गतिशीलतेचे उत्प्रेरक आहे. प्रोत्साहनामुळे दलित, आदिवासी, भटक्या-विमुक्त जाती समूह किंवा गट यांसारख्या समाजघटकांनी शिक्षण, नोकरी आणि राजकारणात स्थान मिळवले आहे.

**प्रोत्साहन आणि मानसिक आरोग्य :-**

आजच्या तणावग्रस्त युगात मानसिक आरोग्य हा मोठा सामाजिक प्रश्न बनला आहे. नैराश्य, चिंता, आत्महत्येची प्रवृत्ती या समस्या प्रामुख्याने तरुणांमध्ये दिसतात. मानसशास्त्र सांगते की एखाद्या व्यक्तीला जेव्हा त्याच्या प्रयत्नांना मान्यता मिळते, तेव्हा त्याचा आत्मसन्मान वाढतो आणि मानसिक आरोग्य सुधारते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून हे महत्त्वाचे आहे कारण निरोगी व्यक्तीच निरोगी समाजाची निर्मिती करू शकते. म्हणूनच प्रोत्साहन ही मानसिक आरोग्याची सामाजिक लस आहे.

**सामाजिक चळवळींमध्ये प्रोत्साहन :-**

प्रत्येक सामाजिक चळवळीचा पाया प्रोत्साहनात दडलेला असतो. लोकमान्य टिळक यांचे 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे विधान म्हणजे जनतेला दिलेले विराट प्रोत्साहन होते. नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे 'तुम मुझे खून दो, मैं तुम्हें आजादी दूँगा' हे आवाहन जनतेला नव्या संघर्षासाठी तयार करणारे ठरले. महात्मा गांधींचे अहिंसेचे तत्त्वज्ञान हे केवळ विचार नव्हते, तर जनतेला दिलेले नैतिक प्रोत्साहन होते. या सर्व उदाहरणांतून स्पष्ट होते की प्रोत्साहन हे मोठ्या सामाजिक बदलांचे प्रेरणास्थान असते.

**डिजिटल युगातील प्रोत्साहन :-**

आजच्या तंत्रज्ञानप्रधान समाजात प्रोत्साहनाचे स्वरूपही बदलले आहे. सोशल मीडियावरील सकारात्मक प्रतिसाद एखाद्या कलाकाराला उभारी देतो. ऑनलाइन शिक्षणात विद्यार्थ्यांना मिळणारे शिक्षकांचे प्रोत्साहन त्यांचा आत्मविश्वास वाढवते. परंतु डिजिटल युगातील नकारात्मक टीका, ट्रोलिंग किंवा उपेक्षा अनेकांना मानसिकदृष्ट्या खचवते. त्यामुळे समाजशास्त्रीय दृष्टीने डिजिटल प्रोत्साहन ही नवी संकल्पना महत्त्वाची ठरते. जबाबदारीने दिलेले प्रोत्साहन समाजाला सकारात्मक दिशा देऊ शकते.

**जागतिक संदर्भातील प्रोत्साहन :-**

समाजशास्त्राचा अभ्यास सांगतो की प्रोत्साहन ही फक्त वैयक्तिक किंवा राष्ट्रीय गोष्ट नसून ती आंतरराष्ट्रीय पातळीवरही महत्त्वाची आहे. विकसित देशांमध्ये 'सक्षमीकरण' या संकल्पनेत प्रोत्साहनाचा आधार आहे. आफ्रिकेतील स्त्रियांना दिलेले प्रोत्साहन, अमेरिकेतील नागरी हक्क चळवळींमध्ये मिळालेला आधार किंवा संयुक्त राष्ट्रसंघाने राबवलेल्या शैक्षणिक मोहिमांमध्ये दिलेले प्रोत्साहन या सर्व उदाहरणांमधून दिसते की प्रोत्साहन हा जागतिक विकासाचा महामार्ग आहे.

**शेवटी,** समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून पाहिले, तर प्रोत्साहन ही एक सामाजिक प्रक्रिया आहे जी व्यक्तीला बळकट करते, गटांना ऐक्य देते आणि समाजाला प्रगतिशील बनवते. दरवर्षी दि. १२ सप्टेंबर रोजी साजरा होणारा राष्ट्रीय प्रोत्साहन दिन हा केवळ प्रतीकात्मक दिवस नाही, तर प्रत्येकाला स्मरण करून देणारा दिवस आहे की आपण आपल्या आजूबाजूच्या लोकांना योग्य वेळी प्रोत्साहन देऊन त्यांच्या जीवनात आशेचा दिवा पेटवू शकतो. जर आपण कुटुंबात मुलांना, शाळेत विद्यार्थ्यांना, कामाच्या ठिकाणी सहकाऱ्यांना, समाजात वंचितांना आणि डिजिटल जगात एकमेकांना प्रामाणिक प्रोत्साहन दिले, तर समाजात सकारात्मकता, समता आणि बंधुता वाढेल. प्रोत्साहन ही केवळ वैयक्तिक कृती नाही, तर सामाजिक परिवर्तनाची ऊर्जा आहे. म्हणूनच राष्ट्रीय प्रोत्साहन दिन हा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून प्रोत्साहनाच्या अपरिमित शक्तीचा सन्मान करणारा उत्सव आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. क्र. ९९६०१०३५८२,**
**bagate.rajendra4@gmail.com**

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002